**ग्रामीण कृषी मौसम सेवा**
भारत मौसम विभाग
प्रायोगिक ब्लॉक लेव्हल ॲग्रोमेट ॲडव्हायझरी बुलेटिन
(आयएमडी आणि आयसीएआर चा संयुक्त उपक्रम)

# हवामानावर आधारीत कृषि सल्ला

**दिनांक : 06-08-2024**

**नागपूर(महाराष्ट्र) मध्ये भिवापूर ब्लॉक करा साठी हवामान पूर्वानुमान - वर जारी :2024-08-06 ( पुढील पाच दिवसांसाठी सकाळी ८:३० वाजेपर्यंत वैध)**

| हवामान घटक | 2024-08-07 | 2024-08-08 | 2024-08-09 | 2024-08-10 | 2024-08-11 |
|---|---|---|---|---|---|
| पर्जन्यमान (मिमी) | 13.8 | 21.3 | 10.4 | 12.4 | 2.3 |
| कमाल तापमान (अं.से) | 32.2 | 29.5 | 30.4 | 31.6 | 32.3 |
| किमान तापमान (अं.से) | 24.4 | 24.0 | 23.7 | 24.3 | 24.2 |
| सकाळची सापेक्ष आर्द्रता (टक्के) | 89 | 89 | 87 | 88 | 88 |
| दुपारची सापेक्ष आर्द्रता (टक्के) | 60 | 77 | 70 | 62 | 65 |
| वाऱ्याचा वेग(किमी/तास) | 17 | 16 | 16 | 16 | 16 |
| वाऱ्याची दिशा(अंश) | 283 | 283 | 257 | 249 | 249 |
| मेघाच्छादन (ऑक्टा) | 8 | 8 | 8 | 8 | 8 |

## हवामान सारांश / चेतावणी:

• भारतीय हवामान विभाग, प्रादेशिक हवामान केंद्र, नागपूर च्या तालुकास्तरीय मूल्यवर्धित अंदाजानुसार, प्रादेशिक हवामान केंद्र, नागपूर च्या जिल्हास्तरीय मूल्यवर्धित अंदाजानुसार, पुढील पाच दिवस दिनांक ०७ ते ११ ऑगस्ट, २०२४ दरम्यान आकाश आंशिक ढगाळ ते मुख्यतः ढगाळ राहण्याची शक्यता, • दिनांक ०७, ०८, ०९, १० आणि ११ ऑगस्ट, २०२४ रोजी हलक्या ते मध्यम स्वरूपाचा पाऊस होण्याची शक्यता, • दिनांक ०७, ०८, ०९ आणि १० ऑगस्ट २०२३ रोजी मेघगर्जनेसह विजांचा कडकडाट होण्याची शक्यता वर्तविण्यात आली आहे. • विस्तारित स्वरूपाच्या अंदाज प्रणालीनुसार विदर्भामध्ये दिनांक ११ ते १७ ऑगस्ट २०२४ या आठवड्यामध्ये पाऊस हा सरासरी पेक्षा कमी राहण्याची शक्यता तर कमाल व किमान तापमान सरासरी एवढे राहील.

## कृषि सल्ला:

• कृषी रसायनांच्या फवारणीची कामे, उभ्या पिकामध्ये खते देण्याची कामे तसेच आंतरमशागतीची कामे पुढील २ ते ३ दिवस पावसाच्या उघाडीनंतर स्थानिक स्वच्छ व शांत हवामान परिस्थितीचा अंदाज घेऊन शक्यतो सकाळच्या वेळी करावी. आंतरमशागतीची कामे (खुरपणी, डवरणी) वाफसा अवस्थेत करावी. • मेघगर्जनेसह विजांचा कडकडाट होण्याचा अंदाज वर्तविलेल्या दिवशी गाय, म्हैस, शेळ्या, मेंढ्या व इतरपाळीव जनावरे मोकळ्या जागेत चरावयास सोडण्याचे टाळावे. जनावरे हे खुल्या पाण्याचे स्त्रोत, नदी किंवा तलाव वट्रॅक्टर व इतर धातूच्या अवजारांपासून दूर ठेवावे. जनावरांना गोठ्यामध्ये पुरेश्या चारा व पाण्याची व्यवस्था करावी.शेतकरी व शेतमजूर बांधवांनी विजांचा कडकडाट होण्याचा अंदाज लक्षात घेता स्वतः ची तसेच पशुधनाची काळजी घ्यावी. झाडाखाली आश्रय घेणे कटाक्षाने टाळावे तसेच पशुधनाचा सुद्धा झाडाखाली आश्रय टाळावा. • शेतकरी बांधवांनी कीड आणि रोगाचा प्रादुर्भाव जाणण्यासाठी पिकाचे नियमित निरीक्षण करावे तसेच शिफारशीनुसार पिक वाढीच्या सुरुवातीच्या अवस्थेमध्ये नियंत्रणाच्या उपाययोजनाचा अवलंब करावा.

## संक्षिप्त संदेश सल्ला:

• शेतकरी बांधवांनी कीड आणि रोगाचा प्रादुर्भाव जाणण्यासाठी पिकाचे नियमित निरीक्षण करावे तसेच शिफारशीनुसार पिक वाढीच्या सुरुवातीच्या अवस्थेमध्ये नियंत्रणाच्या उपाययोजनाचा अवलंब करावा.

## पिक निहाय सल्ला:

| पिक | पिक निहाय सल्ला |
|---|---|
| कपाशी | • डवरणी आणि खुरपनीची कामे शक्यतो सकाळच्या वेळी करावी. प्रभावी तन व्यवस्थापनासाठी तन २ ते ३ पानावर असताना तन नाशकाचा वापर करावा. • पिक उगवणीनंतर तन व्यवस्थापनासाठी, रुंद पानाच्या तन नियंत्रणासाठी पायरिथिओबॅक सोडियम १० % ईसी १२.५ मिली ते १५ मिली प्रती लिटर पाणी किंवा गवतवर्गीय प्रकारच्या तन नियंत्रणासाठी क्विझालोफॉप इथाइल ५ % ईसी १५ मिली प्रती १० लिटर पाण्यात मिसळून जमिनीमध्ये पुरेसा ओलावा असताना स्वच्छ व शांत हवामान परिस्थिती असताना सध्याच्या पावसाच्या उघाडीनंतर फवारणी करावी. • पिक उगवणीनंतर रुंद व अरुंद पानाच्या तन व्यवस्थापनासाठी पायरिथिओबॅक सोडियम ६ % ईसी + क्विझालोफॉप इथाइल ४ % ईसी २० ते २५ मिली प्रती १० लिटर पाणी या प्रमाणात जमिनीमध्ये पुरेसा ओलावा असताना स्वच्छ व शांत हवामान परिस्थिती असताना सध्याच्या पावसाच्या उघाडीनंतर फवारणी करावी. • मर आणि मूळकूज रोग लक्षणे आढळलेल्या शेतात, रोगग्रस्त रोपाच्या सुरुवातीच्या काळात व निरोगी रोपांच्या बाजूस रोग व्यवस्थापनासाठी कार्बेन्डाझिम ५० डब्ल्यूपी @ २० ग्रॅम प्रति १० लिटर पाण्यात मिसळून मुळापर्यंत जाईल अशी आळवणी पावसाच्या उघाडीनंतर (ड्रेंचींग) करावी. |
| सोयाबीन | • शेतकरी बांधवांनी सोयाबीन पिकामध्ये नियमित अंतराने शेताच्या ३ ते ४ ठिकाणी कीड/अळी चा प्रादुर्भाव तसेच त्यांच्या अवस्था या बाबतीत निरीक्षण करावे. यामुळे कीड नियंत्रणाचे उपाय राबविण्यासाठी मदत होईल. • सोयाबीन पिकामध्ये पिवळा मिझेक विषाणू या रोगाचा प्रसार करण्यास कारणीभूत असलेल्या पांढऱ्या माशी या किडीच्या प्रतिबंधात्मक व्यवस्थापनासाठी शेतामध्ये ठीक ठिकाणी पिवळे चिकट सापळे लावावेत. • शेतकरी बांधवांनी अळ्या खाणाऱ्या शिकारी पक्ष्यांना थांबण्यासाठी सोयाबीन शेतात विविध ठिकाणी ‘ T ’ आकाराचे पक्षीथांबे उभारावेत. • सेंद्रिय सोयाबीन उत्पादन करणाऱ्या शेतकरी बांधवांनी पाने खाणाऱ्या किडीच्या (उंटअळी, तंबाखूची पाने खाणारी अळी) नियंत्रणासाठी बॅसिलस थुरिंजेनेसिस किंवा ब्यूव्हेरिया बेसियाना १ लिटर प्रती हेक्टर या प्रमाणात वापर करावा. • सोयाबीन पिकामध्ये खोडमाशी किडीचा प्रादुर्भाव दिसून आल्यास नियंत्रणासाठी थायमेथोक्झाम १२.६ टक्के + लॅम्बडा सायहॅलोथ्रिन ९.५ % झेडसी १२५ मिली प्रती ५०० लिटर पाणी प्रती हेक्टर या प्रमाणात स्थानिक स्वच्छ हवामान परिस्थिती असताना फवारणी करावी. |
| सोयाबीन | • सोयाबीन पिकामध्ये चक्रीभुंगा या किडीचा प्रादुर्भाव दिसून आल्यास प्रादुर्भावग्रस्त झाडे उपटून शेताबाहेर नष्ट करावी. या किडीच्या प्रादुर्भावाची आर्थिक नुकसान पातळी गाठत असल्यास रासायनिक नियंत्रणासाठी थायक्लोप्रिड २१.७ एससी (७५० मिली प्रती हेक्टर) किंवा इमामेक्टिन बेंझोएट ०१.९०% ईसी (४२५ मिली प्रती हेक्टर) किंवा आयसोसायक्लोसेरम ९.२ % डब्ल्यू/डब्ल्यू डीसी (६०० मिली प्रती हेक्टर) किंवा कार्टप हायड्रोक्लोराइड ०४ % + फिप्रोनिल ००.५० % सीजी (२०० मिली/हेक्टर) किंवा एसिटामिप्रिड २५ % + बायफेन्थ्रीन २५ % डब्ल्यूजी (२५० ग्राम प्रती हेक्टर) किंवा टेट्रानिलीप्रोल १८.१८ एससी (२५०-300 मिली/हेक्टर) किंवा प्रोफेनोफॉस ५० ईसी (१ लिटर प्रती हेक्टर) किंवा क्लोरॅंट्रानिलिप्रोल १८.५० % एससी (१५० मिली प्रती हेक्टर) या प्रमाणात कोणत्याही एका कीटकनाशकाची पावसाच्या उघडिपीनंतर फवारणी करावी. • सोयाबीन पिकामध्ये उंट अळी किडीचा प्रादुर्भाव आढळून आल्यास व आर्थिक नुकसान पातळी गाठत असल्यास क्लोरॅंट्रानिलिप्रोल १८.५० % एससी (१५० मिली प्रती हेक्टर) किंवा इमामेक्टिन बेंझोएट ०१.९०% ईसी (४२५ मिली प्रती हेक्टर) किंवा ब्रोफ्लानिलाइड ३०० g/l एससी (४२-६२ ग्राम प्रती हेक्टर) किंवा फ्लुबेन्डियामाइड २० % डब्ल्यूजी (२५०-३०० प्रती हेक्टर) किंवा फ्लुबेन्डियामाइड ३९.३५ % डब्ल्यू/डब्ल्यू एससी (१५० मिली प्रती हेक्टर) किंवा एसिटामिप्रिड २५ % + बायफेन्थ्रीन २५ % डब्ल्यूजी (२५० ग्राम प्रती हेक्टर) किंवा इंडोक्साकार्ब १५.८० % ईसी (३३३ मिली प्रती हेक्टर मिली/हेक्टर) किंवा लॅम्बडा-सायहॅलोथ्रीन ०४.९० % सीएस (३०० मिली प्रती हेक्टर) किंवा प्रोफेनोफॉस ५० ईसी (१ लिटर प्रती हेक्टर) किंवा टेट्रानिलीप्रोल १८.१८ एससी (२५०-३०० मिली/हेक्टर) किंवा पूर्व-मिश्रित कीटक नाशक जसे कि, बीटा-सायफ्लुथ्रिन ०८.४९ % + इमिडाक्लोप्रिड १९.८१ % डब्ल्यू/डब्ल्यू ओडी (३५० मिली प्रती हेक्टर) किंवा नोव्हॅल्युरॉन + इंडोक्साकार्ब ०४.५० % एससी (८२५-८७५ मिली/हेक्टर) किंवा थायामेथोक्सम १२.६० % + लॅम्बडा-सायहॅलोथ्रीन ०९.५० % झेडसी (१२५ मिली/हेक्टर) किंवा क्लोरॅंट्रानिलिप्रोल ०९.३० % + लॅम्बडा-सायहॅलोथ्रीन ०४.६० % झेडसी (२०० मिली प्रती हेक्टर) या प्रमाणात कोणत्याही एका कीटकनाशकाची पावसाच्या उघडिपीनंतर फवारणी करावी. • सोयाबीन पिकामध्ये तंबाखूची पाने खाणाऱ्या अळीचा प्रादुर्भाव आढळून आल्यास व आर्थिक नुकसान पातळी गाठत असल्यास नियंत्रणासाठी, इमामेक्टिन बेंझोएट ०१.९०% ईसी (४२५ मिली प्रती हेक्टर) किंवा ब्रोफ्लानिलाइड ३०० g/l एससी (४२-६२ ग्राम प्रती हेक्टर) किंवा एसिटामिप्रिड २५ % + बायफेन्थ्रीन २५ % डब्ल्यूजी (२५० ग्राम प्रती हेक्टर) किंवा फ्लुबेन्डियामाइड २० % डब्ल्यूजी (२५०-३०० प्रती हेक्टर) किंवा फ्लुबेन्डियामाइड ३९.३५ % डब्ल्यू/डब्ल्यू एससी (१५० मिली प्रती हेक्टर) किंवा इंडोक्साकार्ब १५.८० % ईसी (३३३ मिली प्रती हेक्टर) किंवा टेट्रानिलीप्रोल १८.१८ एससी (२५०-३०० मिली प्रती हेक्टर) किंवा स्पिनोटेरम ११.७ एससी (४५० मिली प्रती हेक्टर) किंवा नोव्हॅल्युरॉन + इंडोक्साकार्ब ०४.५० % एससी (८२५-८७५ मिली/हेक्टर) या प्रमाणात कोणत्याही एका कीटकनाशकाची पावसाच्या उघडिपीनंतर फवारणी करावी. |

| पिक | पिक निहाय सल्ला |
| --- | --- |
| भात | • धान बांधावर झेंडूची सापळा पिक म्हणून लागवड करावी. • रोपांचे शेंडे तोडून बांबूच्या टोपलीत जमा करावी त्यामुळे रोपांच्या शेड्यांवर असणारी खोडकीडींची अंडी नष्ट होवून त्यामधून परोपजिवी किटकसूद्धा बाहेर पडतील. • गराडीची पाने १.५ टन प्रति हेक्टर या प्रमाणात चिखलनीचे वेळी शेतात टाकावीत, यामुळे गादमाशी, तुडतुडे आणि खोडकिडीचा प्रादुर्भाव सुद्धा कमी होतो. • तुड्तुड्यांच्या व्यवस्थापनाकरिता रोपांची लावणी शिफारसीत अंतरावर (२० x १५ किंवा २० x २० सें.मी.), पट्टा पद्धतीने लागवड करावी (१० ओळी किंवा २ मीटर नंतर ३० सेमी. जागा मोकळी सोडावी). • रासायनिक खते:- जमिनीची तपासणी करुन योग्य प्रमाणात रासायनिक खताचा वापर केल्यास शेती किफायतशीर होते. सर्वसाधारणपणे १०० किलो नत्र, ५० किलो स्फुरद व ५० किलो पालाश प्रति हेक्टरी द्यावे. संपूर्ण स्फुरद व पालाश आणि नत्राची अर्धी मात्रा चिखलावर तर उरलेली नत्राची अर्धी मात्रा दोन समान हप्त्यात (फुटवे फुटण्याच्या वेळी साधारणपणे ३० दिवसांनी आणि लोंबी येण्याच्या सुरुवातीस साधारणपणे ६० दिवसांनी) विभागून द्यावी. • तण व्यवस्थापन:- • १) उगवणपूर्व :- पेंडीमेथालिन ३० % ई. सी. @५० मिली रोवणीनंतर ४ ते ७ दिवसात किंवा प्रेटिलाक्लोर ५० % ई. सी. @ २० ते ३० मिली रोवणीनंतर ४ ते ७ दिवसात किंवा पायराझोसल्फुरॉन इथाइल १०% डब्ल्यु.पी. @ २ ते ३ ग्रॅम रोवणीनंतर ४ ते ७ दिवसात प्रती १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. • २) उगवणपश्चात:- बिसपायरीबॅक सोडियम १०% एस.सी. @ ६ ते ७ मिली रोवणीनंतर १० ते १५ दिवसांनी किंवा ब्युटाक्लोर ५०% ई. डब्ल्यु.@ ५० ते ६० मिली रोवणीनंतर १० ते १५ दिवसांनी किंवा अझिमसल्फुरॉन ५०% डी.एफ. @ २.३ ग्रॅम रोवणीनंतर २० ते २५ दिवसांनी प्रती १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. • किड व्यवस्थापन:- • खोडकिडीच्या व्यवस्थापनासाठी हेक्टरी २० या प्रमाणे कामगंध सापळे लावावे. ट्रायकोग्रामा जापोनिकम (ट्रायकोकार्ड) हे परोपजीवी किटक हेक्टरी ५०,००० अंडी या प्रमाणात दर ७ दिवसाच्या अंतराने ३ ते ४ वेळा सोडावे. शेतात १० % किडग्रस्त फुटवे दिसताच क्लोरॅनट्रानीलीप्रोल ०.४ % दाणेदार @ १० कि.ग्रॅ. किंवा कारटॅप हायड्रोक्लोराईड ४ जी @ १८ कि.ग्रॅ. किंवा फीप्रोनिल ०.३ जी @ २५ कि.ग्रॅ. प्रती हेक्टर बांधीमध्ये पाणी असतांना टाकावे किंवा क्लोरॅनट्रानीलीप्रोल १८.५ % एस.सी. @ ३ मिली. प्रति १० लीटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. |
| तूर | • तण व्यवस्थापनासाठी आणि जमीन व पिकामध्ये हवा खेळती राहण्यासाठी स्वच्छ हवामान आणि वाफसा परिस्थितीमध्ये आंतरमशागतीची कामे (खुरपणी/डवरणी) करावी. |
| मुग | • तण व्यवस्थापनासाठी आणि जमीन व पिकामध्ये हवा खेळती राहण्यासाठी स्वच्छ हवामान आणि वाफसा परिस्थितीमध्ये आंतरमशागतीची कामे (खुरपणी/डवरणी) करावी. |
| उडीद | • तण व्यवस्थापनासाठी आणि जमीन व पिकामध्ये हवा खेळती राहण्यासाठी स्वच्छ हवामान आणि वाफसा परिस्थितीमध्ये आंतरमशागतीची कामे (खुरपणी/डवरणी) करावी. |

**फळे आणि भाजीपाला पिक निहाय सल्ला:**

| फळे आणि भाजीपाला पिक | फळे आणि भाजीपाला पिक निहाय सल्ला |
| --- | --- |
| मिरची | • मिरची च्या ४ ते ६ आठवड्याच्या वयाच्या रोपांची लागवड वाफसा अवस्थेत करावी. • मिरचीच्या रोपांची लागवड करण्यापूर्वी रोपांचे शेंडे डायमेथोएट ३० ईसी १० मि. ली + पाण्यात मिसळणारे गंधक (८० %) ३ ग्रॅम + मॅन्कोझेब ७५ % डब्ल्यूपी २.५ ग्रॅम एक लिटर पाण्याच्या द्रावणात बुडवून लावावे. • तण व्यवस्थापनासाठी आणि जमीन व पिकामध्ये हवा खेळती राहण्यासाठी स्वच्छ हवामान आणि वाफसा परिस्थितीमध्ये आंतरमशागतीची कामे (खुरपणी/डवरणी) करावी. |
| संत्रा | • झाडांच्या बुंध्याजवळ पाणी साचून राहणार नाही याची काळजी घ्यावी. आवश्यकता भासलास आधी खोदलेल्या चरांद्वारे अतिरिक्त पाण्याचा निचरा करावा. • फायटोप्थोरा ब्राउन रॉट हा एक फळांचा रोग आहे. जोसहसा सतत दमट हवामान आणि पाण्याचा निचरा न होण्याशी संबंधित असतो. पावसाळ्यात किंवा पावसाळ्याच्या उत्तरार्धात जास्त प्रमाणात पाऊस पडल्यानंतर या रोगाचा प्रादुर्भाव सामान्यतः दिसून येतो. या कालावधीमध्ये इतर कारणांमुळे झालेली फळगळ गोंधळात टाकणारी असते. या रोगाची लक्षणे प्रामुख्याने सुरवातीला परिपक्क किंवा परिपक्व होण्याच्या स्थितीत असलेल्या फळांवरती आढळून येते. सुरुवातीला पाणी शोषण केल्यासारखे घट्ट चमड्या सारखे चट्टे दिसून येतात परंतु ते लवकर मऊ होतात आणि पिवळट तपकिरी रंगाचे दिसू लागतात व त्यांना झोंबणारा गंध येतो. उच्चं आद्रतेमुळे फळांच्या पृष्ठभागावरती बुरशीच्या पांढुरक्या मायसेलिया ची वाढ होते आणि संक्रमित फळ अखेरीस खाली पडतात. प्रसंगी फांद्या, पाने आणि मोहोर तपकिरी रंगाचे होऊन मरतात. या रोगाची सर्वात गंभीरबाब म्हणजे फळ तोडणीच्या आधी फळांवरती लक्षणे दिसत नाही. साठवण आणि वाहतुकीच्या दरम्यान संक्रमित फळे निरोगी फळात मिसळल्यास चांगल्या फळांना सुद्धा यारोगाची लागण होऊन रोगाचा प्रसार होतो. • ब्राऊन रॉट चे व्यवस्थापन प्रतिबंधावर अवलंबून असते. ज्यामध्ये जमिनीपासून २४ इंच किंवा त्यापेक्षा जास्त उंचीवरून झाडाची छाटणी केल्याने या रोगाचे प्रमाण कमी करता येते. कॉपर युक्त बुरशीनाशनकाची (१% बोर्डेक्स मिश्रण किंवा कॉपर ऑक्सिक्लोराईड ३.० ग्राम / लिटर) फवारणी केल्यास दमट हंगामात संरक्षण प्रदान करते. पाऊस जास्त पडल्यास ऑगस्ट |

| फळे आणि भाजीपाला पिक | फळे आणि भाजीपाला पिक निहाय सल्ला |
|---|---|
| | किंवा सप्टेंबर च्यामहिन्यामध्ये वरील बुरशीनाशनकाची पुन्हा फवारणी करावी. रोगाचा गंभीर धोका असल्यास उत्पादकांना संक्रमित फळबागांमध्ये फॉसेटिल अल्युमिनियम किंवा मेफेनोक्झाम एमझेड @ २.५ ग्रॅम / लिटर पाण्यात फवारणी करावी. फळ तोडणीच्या वेळी संक्रमित फळे क्रेट / बॉक्स मध्ये टाकल्या जाऊ नये याची खबरदारी घ्यावी तसे केल्यास प्रक्रिया किंवा पॅकेजिंग ची सुविधा नाकारण्यात येऊ शकते. |
| वांगे | • वांग्याच्या च्या ४ ते ६ आठवड्याच्या वयाच्या रोपांची लागवड वाफसा अवस्थेत करावी. • तण व्यवस्थापनासाठी आणि जमीन व पिकामध्ये हवा खेळती राहण्यासाठी स्वच्छ हवामान आणि वाफसा परिस्थितीमध्ये आंतरमशागतीची कामे (खुरपणी/डवरणी) करावी. |
| टोमॅटो | • टोमाटो च्या ४ ते ६ आठवड्याच्या वयाच्या रोपांची लागवड वाफसा अवस्थेत करावी. • तण व्यवस्थापनासाठी आणि जमीन व पिकामध्ये हवा खेळती राहण्यासाठी स्वच्छ हवामान आणि वाफसा परिस्थितीमध्ये आंतरमशागतीची कामे (खुरपणी/डवरणी) करावी. |
| आंबा | • एक वर्ष वयाचे गावरान आंब्याच्या रोपट्यावर दशहरी, केशर, आम्रपाली जातीचे मृदकाष्ट कलम करावे. |
| पपई | • पपईची ६-७ आठवडे वयाची रोपे २x२ मीटर अंतरावर ३०x३० x३० सें.मी. आकाराचे खड्डे खोदून भरावीत व रोपांची लागवड करावी. |
| मुळा | • मुळ्याच्या पुसा देशी, पुसा केतकी जातीचे बियाणे ४५ x १० सें.मी. अंतरावर वरंब्यावर बी टोकून करावी. यावेळी वाफसा अवस्थेत हेक्टरी ५० किलो नत्र + २५ किलो स्फुरद द्यावे. |

## पशुधन विषयक निहाय सल्ला:

| पशुधन विषयक | पशुधन विषयक निहाय सल्ला |
|---|---|
| गाय | • पाऊस व विजांचा कडकडाट होण्याची शक्यता लक्षात घेता गाय, म्हैस, शेळ्या, मेंढ्याव इतर पाळीव जनावरे मोकळ्या जागेत चरावयास सोडण्याचे टाळावे. जनावरे हे खुल्या पाण्याचे स्त्रोत, नदी किंवा तलाव व ट्रक्टर व इतरधातूच्या अवजारांपासून दूर ठेवावे. • जनावरे पावसात फार काळ भिजणार नाहीत याची काळजी घ्यावी. • गोठयातील जमीन कोरडी ठेवावी व स्वच्छता राखावी. • बुरशी लागू नये यासाठी जनवारांचे खाद्य व चारा सुरक्षित साठवावा. • जनावरांच्या गोठयाचा सभोवतालील परिसर स्वच्छ व निरोगी ठेवावा आणि गोठ्याभोवती असलेली अनावश्यक झाडे झुडुपे काढून टाकावीत. • नवीन हिरवा चारा जास्त प्रमाणात खाण्यास जनावरांना प्रतिबंध करावा. |
| गाय | • शेळ्यांना पायखुरी/तोंडखुरी, घटसर्प आणि आंत्रविषार टाळण्याकरिता पशुवैद्यकीय अधिकाऱ्याच्या सल्ल्याने लसीकरण करावे. जनावरांना स्वच्छ आणि थंड पाण्याची सोय करावी. |

## कुकुटपालन विषयक निहाय सल्ला:

| कुकुटपालन विषयक | कुकुटपालन विषयक निहाय सल्ला |
|---|---|
| पक्षी | • पक्षांना सकस आहार तसेच स्वच्छ व थंड पाण्याची व्यवस्था करावी. |